## DISTRICT & SESSIONS COURT, KOLHAPUR/ ICHALKARANJI
## CIVIL/CRIMINAL FILING FORM

| | |
|---|---|
| **Case type** | RCS- |

### APPLICANT/COMPLAINANT DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name** | SOU. SUJATA RAMCHANDRA KURADE & Anthrs | | | | |
| **Father/Mother/Husband** | RAMCHANDRA KURADE | | | | |
| **Address** | BIRDEO NAGAR, RENDAL. TAL-HATKANANAGALE DIST- KOLHAPUR | | | | |
| **Sex** | Male | Female | | Age | 47 |
| **Nationality** | Indian<br>If Not Mentioned | | | Indian | |
| **E-Mail Address** | ruturajgaladage @gmail.com | Phone No. | | Fax No | |
| | | Mobile No.8182817878 | | | |
| **Subject** | CIVIL DAITH DECLRATION | | | | |
| **Advocate Code** | **1651** | Adv.Name:**Adv R.S.Galadage**<br>Mobile No. **8182817878, 9881992183** | | | |

### OPPONENT/ACCUSED DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name** | NO ONE | | | | |
| **Father/Mother/Husband** | | | | | |
| **Address** | | | | | |
| **Sex** | Male | Female | | Age | |
| **Nationality** | Indian<br>If Not Mentioned | | | Indian | |
| **E-Mail Address** | | Phone No. | | Fax No | |
| | | Mobile No. | | | |
| **Subject** | | | | | |
| **Advocate Code** | | Adv.Name:<br>Mobile No. | | | |

### POLICE STATION DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Police Station** | | Fir no. | | Year | |
| **Trail (Tick one)** | Session | Regular | Summary | | |
| | | | | | |
| **Complaint(Tick one)** | Police Challan | Private Complaint | | Date OF Offence | |

### LOWER COURT DETAILS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Court Name | | | | |
| Case no. | | Decision Date | | |

### MAIN MATTER DETAILS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Case Type** | **Bail** | **Case No** | **Year** | **20** |

### FOR OFFICE USE ONLY

| | | |
|---|---|---|
| Objection Redressal Date: / /2025 | | Objection Compliance Date: / /2025 |
| Registration No. | | Registration Date: / /2025 Listing Date: / /2025 |
| Court Alloters | | Allocation Date: / /2025 |

**Presented By**

**Adv.R.S.Galadage** [signature] Adv.

ई-फ़ायलिंग नं-

दैनिक रजि नं- /२०२६

दाखल ता - १९/०१/२०२६

रे.क.नं- /२०२६

**मे. दिवाणी न्यायाधीशसो व. स्तर, इचलकरंजी.**

**यांचे कोर्टात ......**

१) सौ.सुजाता रामचंद्र कुराडे
व.व- ४७, धंदा- घरकाम
रा- बिरदेव नगर, रेंदाळ.
ता-हातकणंगले,जि-कोल्हापुर.

२) कु.स्वप्निल रामचंद्र कुराडे
व.व- २७ धंदा-नोकरी
रा-वरिलप्रमाणे.

३) सौ.कोमल अजय माने
व.व-३० धंदा-घरकाम
रा-शालिनी निवास, इंन्द्रा नगर,कोरोची.
ता-हातकणंगले जि-कोल्हापुर.

४) सौ.काजल अक्षय भोसले
व.व-२९ धंदा-घरकाम
रा-३८९/B/१, व्यंकटेश्वरा पार्क, गडमुडशिंगी.
ता-करवीर. जि-कोल्हापुर.

} वादी

Issue paper Publication
or citation

Sd/-
I/c. 4th C.J.J.D., Ichalkaranji

विरुद्ध.

कोणीही नाही } प्रतिवादी

19-1-26

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

**दावा- हक्कज्ञापनाकरीता.**

**दाव्याची आकारणी कोर्ट फी व ज्यूरीसडीक्शन**

**करीता- र रु-१०००/-**

स्पेसीफिक रिलिफ ॲक्ट- 1963 चे
कलम - 34 प्रमाणे दावा.

**यातील वादी यांची मे.कोर्टास नम्र विनंती की,**

**१)** यातील वादी नं-१ यांचे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.रामचंद्र राजाराम कुराडे हे ०१/०२/२०१८ इ. रोजी राहते घरातुन कोणास काहीही न सांगता निघून गेलेले आहेत. त्यावेळी यातील वादी नं-१ यांनी त्यांचे भाऊ संजय राम संकपाळ रा-डफ़ळापुर ता-मिरज यांना बोलावून घेवून त्यांचे पती श्री.रामचंद्र राजाराम कुराडे यांचा जत, सांगली, मिरज या ठीकाणी जावून व मित्र मंडळी, पै-पाहूण्यांशी संपर्क साधून शोध घेतला परंतू श्री.रामचंद्र राजाराम कुराडे हे आजतागायत मिळून आलेले नाहीत.

**२)** त्यानंतर यातील वादी नं-१ यांची मुले म्हणजेच वादी नं-२ ते ४ ही लहान असलेमुळे त्यांनी त्यांचे भाऊ संजय संकपाळ यांचे मदतीने श्री.रामचंद्र राजाराम कुराडे यांचा सर्व नातेवाईक, पै-पाहूने यांचेकडे शोध व माहीती घेतली मात्र ते मिळून न आलेने यातील वादी नं-१ यांनी पोलिस ठाणे, हुपरी या ठीकाणी जावून ता-२१/०४/२०१८इ. रोजी श्री.रामचंद्र राजाराम कुराडे ही व्यक्ती मिसिंग असलेबाबत तसा वर्दी जबाब नोंदविलेला आहे.

19-1-26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

३) यातील वादी नं-१ यांचे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ०१/०२/२०१८ इ. रोजी पासून अध्याप कोणालाही दिसून आलेले नाहीत व त्यांचा आजतागायत कोठेही ठावठिकाणा लागलेला नाही. यातील वादी नं-१ यांचे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांनी ता-०१/०२/२०१८ इ. रोजी पासून म्हणजेच गेल्या ७ वर्षांहून अधिक काळ सलगपणे वादी अगर त्यांचे पै-पाहूणे, मित्र मंडळी यांना एकदाही संपर्क साधलेला नाही व अन्य कोणाचाही त्यांच्याशी संपर्क झालेला नाही. श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे त्यांचे रेंदाळ येथील राहते घरी परत आलेले नाहीत. पोलिसांनी देखील शोधाशोध करून श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे मिळून आलेले नाहीत अगर त्यांचा ठावठीकाणा लागलेला नाही. सदर श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ता-०१/०२/२०१८ इ. ऱोजी पासून बेपत्ता आहेत. सबब वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

४) श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ता-०१/०२/२०१८ इ. रोजी पासून वादी यांचेकडे परत आलेले नाहीत. अथवा वादी यांनी त्यांचा शोध घेवून देखील ते कोठेही मिळून आलेले नाहीत अगर त्यांचा गेले सात वर्षांहून अधिक काळ कोणाशीही संपर्क झालेला नाही. श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे पश्चात निरनिराळ्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांत व कागदोपत्री श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे सरळ व कायदेशीर वारस म्हणून यातील वादी नं-१ ते ४ यांची नोंद होणे गरजेचे व आवश्यक आहे. यातील वादी नं-१ ते ४ हेच

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे सरळ व कायदेशीर वारस असून त्यांना अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत. तथापी श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे गेल्या ७ वर्षाहून अधिक काळ बेपत्ता असलेने त्यांचा दिवाणी मृत्यू झालेचे ठरवून मिळणेकरीता व श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे वादी नं-१ ते ४ हेच सरळ व कायदेशीर वारस असलेचे ठरवून मिळणेकरीता वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

**५) दाव्यास कारण-**

यातील वादी नं-१ यांचे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे ०१/०२/२०१८ इ. रोजी राहते घरातुन कोणास काहीही न सांगता निघून गेलेले आहेत. त्यावेळेस व वादी यांनी ता-२१/०४/२०१८इ. रोजी श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे ही व्यक्ती मिसिंग असलेबाबत तसा वर्दी जबाब नोंदविलेला आहे. पोलिसांनी देखील चौकशी,शोधाशोध करून श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे मिळून आलेले नाहीत अगर त्यांचा आजतागायत ठावठीकाणा लागलेला नाही. त्यावेळी व श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचा गेले ७ वर्षाहून अधिक काळ कोणाशीही संपर्क झालेला नाही. त्यावेळी, त्यासुमारास व आजतागायत दावेस कारण घडलेले आहे.

**६) दावेचा तपशील-**

| **रुपये पैसे** | **तपशील** |
| --- | --- |
| र.रु-१.०००/- | यातील वादी यांनी हक्कज्ञापणाची दाद मागितलेली असून त्याची आकारणी सदरी दाखल. |

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

**७) दावेची आकारणी-**

दाव्याची आकारणी कोर्ट फ़ी करीता व ज्युरीसडीक्शन करीता र.रु-१.०००/- केली असून, त्यावर महाराष्ट्र कोर्ट फ़ी अधिनियम ॲक्ट १९५१ चे कलम ६(j) नुसार योग्य तो कोर्ट फ़ी स्टॅम्प जोडला आहे.

८) **अधिकारक्षेत्र-** श्री.ऱामचंद्र राजाराम कुराडे हे रेंदाळ येथील त्यांचे राहत्या घरातुन निघून गेलेले आहेत. तसेच यातील वादी हे मे. कोर्टाचे स्थलसिमेत राहत असलेने सदरचा दावा चालवून निकाली काढणेचा अधिकार या मे. कोर्टास आहे.

९) दावेतील मागणीसाठी वादींनी अन्य दावा दाखल केलेला नाही.

**१०) सबब वादी यांची नम्र विनंती की,**

**अ)** वादी यांचा प्रस्तुतचा दावा मंजूर करणेत यावे.

**ब)** यातील वादी नं-१ यांचे पती व वादी नं-२ ते ४ यांचे वडील श्री. ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचा दिवाणी मृत्यू झालेचे हक्कज्ञापन होवून मिळावे व तसा हुकुमनामा व्हावा.

**क)** श्री. ऱामचंद्र राजाराम कुराडे यांचे वादी नं-१ ते ४ हेच सरळ व कायदेशीर वारस असलेचे हक्कज्ञापन होवून मिळावे व तसा हुकुमनामा व्हावा.

**इ)** इतर न्यायाचे व समतेचे सर्व हुकूम वादी यांचे बाजूने व्हावेत.

**ई)** जरूर तर दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

सोबत वकीलपत्र, कागद यादी व त्याप्रमाणे कागद आणि असे कागद जोडलेले आहेत.

येणेप्रमाणे दावा असे.

इचलकरंजी

ता-१९ /०१/२०२६

वादी यांनी दिली माहीती व
कागदपत्रांचे आधारे दावा तयार
करून दाखल केला

(ॲड.आर.एस.गळदगे) वादी

**- प्रतिज्ञा -**

मी यातील वादी नं-१ सौ.सुजाता रामचंद्र कुराडे व.व-४७, धंदा- घरकाम रा- बिरदेव नगर, रेंदाळ. ता- हातकणंगले, जि- कोल्हापुर. सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, प्रस्तुत दावेतील सर्व मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणूण केली प्रतिज्ञा आज मु।

इचलकरंजी

ता -१९ /०१/२०२६ वादी

**- ॲफ़िडेव्हिट -**

मी यातील वादी नं-१ सौ.सुजाता रामचंद्र कुराडे व.व-४७, धंदा- घरकाम रा- बिरदेव नगर, रेंदाळ. ता-हातकणंगले, जि-कोल्हापुर.सत्य शपथेवर कथन करते की, प्रस्तुत दावेतील सर्व मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणूण केले ॲफ़िडेव्हिट आज मु।

इचलकरंजी

ता - १९/०१/२०२६

मी वादी यास ओळखतो

अडव्होकेट वादी

( ॲड.आर.एस.गळदगे )

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

**- प्रतिज्ञा -**

मी यातील वादी नं-१ सौ.सुजाता रामचंद्र कुराडे व.व-४७, धंदा- घरकाम रा- बिरदेव नगर, रेंदाळ. ता-हातकणंगले, जि-कोल्हापुर. सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, प्रस्तुत दावेतील व ॲफ़िडेव्हिट मधील सर्व मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु ।

इचलकरंजी

ता- १९/०१/२०२६

RKurade

वादी

Solemnly Affirmed before me by
Shri. Sou. Sujata Ramchandra Kurade
of Birdevnagar Rendal who is
identified by Shri. Adv. R.S. Galadge
............whom I know personally
Dated :- 19-1-2026

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji